नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ५४ | Issue - 54 | वार शुक्रवार दि. ११ जुलै २०२५ | Blow- Friday Date 11 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# जनसुरक्षा विधेयक एकमताने मंजूर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मांडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जनसुरक्षा विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मांडलं. या विधेयकावरुन सभागृहात चर्चा झाली. यानंतर आवाजी मतदान पद्धतीने मतदान पार पडलं. यानंतर जनसुरक्षा विधेयक विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आलं आहे. विधानसभेनंतर आता विधान परिषदेत हे विधेयक मांडलं जाईल. विधान परिषदेत विधेयक मंजूर झाल्यानंतर राज्यपालांच्या अंतिम स्वाक्षरीनंतर या विधेयकाचं कायद्यात रुपांतर होईल. शहरी नक्षलवाद नियंत्रणात आणण्यासाठी हा कायदा राज्यात लागू करण्यात येत आहे. हा कायदा कुठल्याही डाव्या विचारांच्या, संघटनांच्या किंवा पक्षाच्या विरोधात नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे.



देशातील काही राज्यांमध्ये मागच्या काळात मोठ्या प्रमाणात नक्षलग्रस्त झाले आहेत. माओवाद विचाराने प्रेरित होऊन अनेकजण सुरुवातीच्या काळात बंदूका हातात घेऊन व्यवस्थेच्या विरोधात लढायचे.

भारतीय संविधानाने जी व्यवस्था उभी केली आहे ती आम्हाला मान्य नाही. आम्हाला साम्यवादी व्यवस्था उभी करायची आहे, अशा प्रकारच्या विचारातून या संघटना निर्माण झाल्या. गेल्या काही वर्षांमध्ये केंद्र सरकार आणि विविध राज्य सरकारने काम केलं. यामुळे हा माओवाद हळूहळू संपुष्टात यायला लागला. महाराष्ट्रात केवळ दोन तालुक्यात माओवाद सक्रीय दिसत आहेत. पण आगामी काळात तो देखील राहणार नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

असं असलं तरी त्याचवेळी त्याचं दुसरं स्वरुप सुरु झालं. त्यातून मोठ्या प्रमाणात संघटना बनवण्यात आली. त्या संघटनांचं नाव पाहिल्यावर लोकशाही वाचवण्यासाठी सुरु केल्याचा भास होतो. पण तसं नाही. त्या संघटना भारताचं संविधान मानत नाहीत. त्यामुळे भारतीय कम्युनिस्ट माओवादी ही संघटना बॅन आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आपल्या लोकांचा जे लोक ब्रेनवॉश करत आहेत त्यांच्यावर कारवाई करणं ही काळाची गरज आहे. त्यामुळे आपण हा कायदा करत आहोत. कुठल्याही पत्रकार, राजकीय नेत्यावर कारवाई करता येत नाही. ज्याच्यावर कारवाई होईल ती न्यायाधीशांच्या आदेशानुसार होते. देशाच्या व्यवस्थेवर घाला घालणाऱ्या लोकांविरोधात कडक कारवाई करावीच लागते, असं देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. महाराष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी हा कायदा आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सांगितलं.

# टेनिसपटू राधिका यादवची निर्घृण हत्या, रील बनवण्याचा नाद जीवावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सध्या जग टेनिसच्या सर्वात प्रतिष्ठित ग्रँड स्लॅम, विम्बल्डनमुळे चर्चेत आहे आणि मोठ्या सेलिब्रिटींपासून ते अनेक चाहत्यांपर्यंत सर्वजण या स्पर्धेवर लक्ष ठेवून आहेत. यादरम्यान, भारतातून टेनिस विश्वाला हादरवणारी एक दुःखद आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. भारतीय टेनिसची उदयोन्मुख खेळाडू २५ वर्षांची राधिका यादव हिची तिच्याच वडिलांनी गोळ्या झाडून हत्या केल्याची घटना घडली.

भारतातील टेनिस जगतातून एक धक्कादायक बातमी आली आहे. गुरुवारी हरियाणातील गुरुग्राममध्ये टेनिसपटू राधिका यादवची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. सर्वात धक्कादायक गोष्ट म्हणजे वडिलांवर हत्येचा आरोप करण्यात आला आहे आणि

### नाराज वडिलांनी तीन गोळ्या झाडून संपवले

त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

गुरुवारी सकाळी १०.३० च्या सुमारास २५ वर्षीय टेनिस खेळाडूच्या वडिलांनी तिला गोळी मारली. टेनिस खेळाडू तिच्या कुटुंबासह येथील सेक्टर ५७ मधील पहिल्या मजल्यावर राहत होती. तीन वेळा गोळ्या झाडल्यानंतर, राधिकाला गंभीर अवस्थेत एका खाजगी रुग्णालयात नेण्यात आले, जिथे तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. सोशल मीडियावर रील बनवल्याबद्दल वडील राधिकावर रागावले होते. ज्यामुळे तिला गोळ्या झाडून मारले अशी प्राथमिक माहिती समोर आले आहे.

राधिका ही एक प्रसिद्ध राज्यस्तरीय खेळाडू होती. तिने अनेक पदके जिंकली होती. ती एक टेनिस अकादमी देखील चालवत होती, जिथे ती इतर मुलांना टेनिस शिकवत असे. टेनिस खेळाडूची हत्या का करण्यात आली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

गुरुग्राम सेक्टर ५६ च्या पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, त्यांना गुरुवारी सकाळी माहिती मिळाली की २५ वर्षीय महिलेची हत्या करण्यात आली आहे. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांनी मुलीच्या काकांशी बोलले, पण त्यांनी काहीही सांगितले नाही. घटनास्थळीच पोलिसांना कळले की मुलीच्या वडिलांनी तिला गोळी मारली आहे. महिलेला तीन गोळ्या लागल्या होत्या. पोलिसांनी हत्येत वापरलेले रिव्हॉल्व्हर जप्त केले आहे.

# महाराष्ट्रातील तीन सहकारी बँकांना आरबीआयकडून विविध कारणासाठी दंड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बई : रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया हे देशातील मध्यवर्ती बँक आहे. देशातील सर्व बँकांवर नियंत्रण ठेवण्याचं काम रिझर्व्ह बँकेकडून केलं जातं. ज्या बँकांकडून बँकिंग संदर्भातील नियमांचं उल्लंघन किंवा पालन केलं जात नाही, त्यांच्यावर कारवाई करण्याच काम आरबीआयकडून केलं जातं. ज्या बँकांकडून नियमांचं पालन होत नाही त्यांच्यावर आरबीआयकडून वेगवेगळ्या प्रकारची कारवाई केली जाते. महाराष्ट्रातील तीन सहकारी बँकांना आर्थिक दंड आकरण्यात आल्यासंदर्भातील प्रसिद्धीपत्रकं आरबीआयनं त्यांच्या वेबसाईटवर प्रसिद्ध केली आहेत. आरबीआयच्या वेबसाईटनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर, सोलापूर जनता सहकारी बँक लिमिटेड आणि महेश अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, परळी वैजनाथ या बँकांवर आर्थिक दंडाची कारवाई करण्यात आली आहे. तीन बँकांवर वेगवेगळ्या कारणांसाठी कारवाई करण्यात आली आहे.

सोलापूर जनता सहकारी बँक लिमिटेडला आरबीआयनं १५ लाखांचा दंड केला आहे. तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर या बँकेला दीड लाख रुपयांचा तर महेश अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, परळी वैजनाथ या बँकेला ५० हजार रुपयांचा दंड आरबीआयनं केला आहे. आरबीआयनं या तीन बँकांना त्यांच्याकडे असलेल्या अधिकारांच्या आधारे मौद्रिक कारणांसाठी दंड केला आहे.

### सोलापूर, बीड आणि नागपूरच्या बँकेचा समावेश

आरबीआयनं महेश अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड परळी वैजनाथ यांच्यावर ७ जुलै २०२५ च्या आदेशानुसार मॉनेटरी दंड ५० हजार रुपये ठोठावला आहे. याचं कारण बँकेकडून आरबीआयच्या 'एक्पोझर नॉर्म्स अँड स्टॅट्युटरी / ऑदर रिस्ट्रिक्शन्स-यूसीबी आणि इतर मार्गदर्शक सूचनांची पूर्तता न केल्यानं आकारण्यात आला आहे. आरबीआयनं बँकेच्या ३१ मार्च २०२४ च्या आर्थिक स्थितीचं परीक्षण करुन हा निर्णय घेतला आहे. नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडला ८ जुलै २०२५ च्या आदेशानं दीड लाख रुपयांचा दंड केला आहे. बँकेनं आरबीआयच्या लोन अँड ॲडव्हानसेस टू डायरेक्टर्स, रिलेटीव्ह अँड फर्म्स संदर्भातील मार्गदर्शक सूचनांची पूर्तता न केल्यानं दंड आकारला आहे. आरबीआयच्या प्रसिद्धीपत्रकानुसार बँकेला त्यांची बाजू मांडण्याची संधी देखील देण्यात आली होती. संचालकांची कर्जे आणि कर्ज वितरणासंदर्भातील इतर मार्गदर्शख सूचनांची पूर्तता केल्यानं हा दंड आकारला गेला आहे. आरबीआयनं सोलापूर जनता सहकारी बँक लिमिटेडला बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या सेक्शन ५ (सीसीव्ही) (ळळळ) आणि सेक्शन ५६ या नियमांचं उल्लंघन केल्यानं १५ लाख रुपयांचा दंड आकारला आहे.

# प्रत्येक शाळेत मराठी शिकविणे बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शाळा अनुदानित असो वा विनाअनुदानित, सरकारी असो वा खासगी तेथे मराठी विषय शिकवलाच गेला पाहिजे. प्रत्येक शाळेत मराठी भाषा बंधनकारक आहे. प्रत्येक शाळेत त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. शाळा प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे निर्देश शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिले.



बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात शालेय शिक्षण विभागाची आढावा बैठक झाली. बैठकीत बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंग देओल, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (शिक्षण) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर, शिक्षण उपसंचालक राजेश कंकाळ आदींसह शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते.

### शिक्षण विभाग आढावा बैठकीत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांचे निर्देश

शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये (सीबीएसई) राज्यभाषा मराठी शिकविणे अनिवार्य आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास शिकविणे देखील बंधनकारक आहे. सर्व शिक्षकांनी याकडे लक्ष द्यावे. तसेच प्रत्येक शाळेत राष्ट्रगीतानंतर राज्यगीत 'गर्जा महाराष्ट्र माझा' हे म्हटले गेले पाहिजे. यासोबतच मराठी भाषा, अभिजात भाषा दर्जाबाबतही प्रत्येक शाळेत विविध उपक्रम राबविण्यात यावेत. विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच वृक्षारोपणाचे महत्त्व कळावे यासाठी शाळांमध्ये 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम सुरू करण्यात यावा. यासाठी प्रत्येक झाडाला क्यूआर कोड देऊन, झाडांचा वाढदिवस देखील साजरा करावा. अधिकाऱ्यांपासून विद्यार्थ्यांपर्यंत प्रत्येकाला एका झाडाच्या संगोपनाची जाबाबदारी देण्यात यावी, जेणेकरून विद्यार्थी त्या झाडाची काळजी घेतील. श्री. भुसे म्हणाले, पुढील वर्षांपासून इयत्ता चौथी आणि सातवीचे विद्यार्थी देखील शिष्यवृत्ती परीक्षेला बसू शकतील. शाळांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी सामाजिक संस्थांची मदत घ्यावी. शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी विविध शासकीय योजनांद्वारे पायाभूत सुविधांचा विकास करावा. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळा दत्तक घ्याव्यात. काही शाळांबाहेरील पानटपऱ्यांवर कारवाई करावी. यासोबतच आधार, अपार आयडी पडताळणी, निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत कृती कार्यक्रम आदी विषयांचाही श्री. भुसे यांना आढावा घेतला.

### नागरी क्षेत्रातील आरोग्य प्रकल्पांच्या कामांसाठी पालक सचिवांनी नियोजनबध्द कार्यक्रम आखावा

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

# सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, : आरोग्य विभागाच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी ग्रामीण व शहरी भागात लोकसंख्यानिहाय आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी काटेकोर नियोजन करावे. नागरी क्षेत्रातील आरोग्य प्रकल्पांच्या कामांसाठी प्रत्येक पालक सचिवांनी नियोजनबध्द कार्यक्रम आखून या कामांना गती द्यावी. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देवून 'आपले सरकार' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधानभवन येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न, नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यातील प्राथमिक आरोग्य सेवा मजबूत करून ग्रामीण भागाप्रमाणे शहरात देखील प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या वाढवावी.नवीन रूग्णवाहिकांसाठी करण्यात येणारे करार,३९८ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि २८०६ उपकेंद्रांचे आधुनिकीकरण करण्यासाठी ५९८३ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून हा निधी टप्प्याटप्प्याने मिळणार आहे. राज्यशासन तसेच वित्तीय संस्थाकडून मिळणा-या निधीच्या खर्चाचे योग्य नियोजन करावे. केंद्र शासनाच्या आरोग्य योजना व राज्यातील आरोग्य योजना प्रभावीपणे राबविण्यात याव्यात. जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालयांचे बळकटीकरण करण्यास प्राधान्य देण्यात यावे. प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी विभागाने नवीन मार्गदर्शक सूचना लागू कराव्यात. नवीन पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या स्थापनेबाबत कार्यवाही गतीने करावी, असे आदेशही त्यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की,औषधे व उपकरणांची खरेदी सुलभ पध्दतीने करावी. आरोग्य सेवांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा. सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या क्षमता बांधणीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवावे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत असलेल्या रूग्णालयांचा सर्व डेटा ऑनलाईन उपलब्ध करावा. एकाच वेळी खात्रीपूर्वक माहिती मिळाल्यामुळे रूग्णांना आणि आरोग्य विभागाला आरोग्य सेवा सुलभपणे देता येतील. नागरिकांना आरोग्य विभागातील सर्व योजनांची माहिती सहज उपलब्ध होण्यासाठी आरोग्य विभागाचे संकेतस्थळ देखील अद्यावत करण्यात यावे.राज्याच्या आरोग्य धोरणाचा सर्वसमावेशक प्रारूप आराखडा तयार करावा. आरोग्य विभागातील सेवा भरतीसाठी मंडळाची स्थापना करणे,आरोग्य सेवांचे विकेंद्रीकरण करून रूग्णांना चांगल्या दर्जाच्या सेवा देण्यासाठी आरोग्य विभागाने प्राधान्य द्यावे असे निर्देश मुख्यमंत्री यांनी दिले.

आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक,सचिव विरेंद्र सिंह यांनी विभागातील कामकाजाचे सादरीकरण केले. सचिव डॉ.निपुण विनायक यांनी बंधपत्र धोरणाबाबत वस्तुस्थिती आणि बदलेली परिस्थिती याचे सादरीकरण केले.

मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव वित्त ओ. पी. गुप्ता, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (कौशल्य विकास व उद्योजकता) मनीषा वर्मा, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, मुख्यमंत्री यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार,आरोग्य विभागाचे सचिव डॉ.निपुण विनायक, सचिव विरेंद्र सिंह, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय महेश आव्हाड बैठकीला उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज


## संपादकीय....

## सुरक्षित वातावरण

भारतातील नक्षलप्रभावीत राज्य असलेल्या आंध्र प्रदेश, तेलंगणा, छत्तीसगड या राज्यामध्ये आधीच असा कायदा अस्तित्वात आहे. मात्र महाराष्ट्रात अजूनही अशा प्रकारचा कोणताही कायदा नव्हता. त्यामुळे नक्षलवादी, माओवादी आणि अंतर्गत सुरक्षेला धोका पोहोचवणाऱ्या संघटना आणि व्यक्ती यांच्यावर कारवाई करताना पोलिसांना केंद्राच्या कायद्याचा आधार घ्यावा लागत होता. जनसुरक्षा कायदा हा अजामीनपात्र आणि प्रतिबंधात्मक कायदा आहे. या कायद्यामुळे कोणाच्याही अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येणार नाही. नागरिकांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देण्यासाठीच हा कायदा करण्यात येत आहे. जनसुरक्षा कायदा प्रामुख्याने अंतर्गत सुरक्षेशी संबंधित असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, या कायद्याचा मुख्य उद्देश नक्षलवादी, माओवादी आणि अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटना आणि व्यक्तींवर कारवाई करणे आहे. केंद्रीय कायद्याअंतर्गत कारवाई करताना अनेक वेळा प्रशासकीय अडचणी आणि पूर्वपरवानगीचे अडथळे येतात. महाराष्ट्रात स्वतःचा स्वतंत्र कायदा बनवण्याची मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. या कायद्यामुळे नक्षली चळवळींना मोठा हादरा बसणार आहे. महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक विधानसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले. हे विधेयक देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. संविधान विरोधी माओवादी चळवळ, नक्षलवाद्यांना प्रतिबंध करण्यासाठी हे विधेयक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या कायद्यांतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटनेशी संबंधित व्यक्ती, नक्षलवादी आणि माओवादी संघटनांवर कारवाई केली जाणार आहे.



## पुणे जिल्हा टायगर ग्रुपच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस के गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील जळकोटवाडी ( नळ ) येथील रहिवासी असलेले मात्र विद्यमान स्थितीत पुणे येथे वास्तव्यास असलेले टायगर ग्रुप चे पुणे विभाग कार्याध्यक्ष अभिजीत अशोक पवार यांच्यासह त्यांचे मित्र पुणे पिंपरी चिंचवड येथील टायगर ग्रुप चे अमोल रावळकर, पुणे येथीलच युवा उद्योजक ओमकार बोरसे ( पाटील ) यांच्या ०७ जुलै या जन्मदिवसाचे औचित्य साधून त्यांनी यंदा तुळजापूर तालुक्यातील स्वतःची जन्मभूमी असलेल्या जळकोटवाडी ( नळ ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व इंदिरा काळे प्रशाला, हंगरगा ( नळ ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नंदगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, होर्टी येथील जिल्हा परिषदेची केंद्रीय प्राथमिक शाळा इत्यादी शाळेमधील विद्यार्थी व विद्यार्थिनींना मोठ्या दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत तब्बल १००० ( एक हजार ) छत्र्यांचे वाटप केले.

अभिजीत पवार यांनी टायगर ग्रुप च्या वतीने दरवर्षी वह्या, शालेय दप्तर आदी विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप केले आहे. आपल्या जन्मभूमीचे ऋण फेडण्यासाठी गोरगरीब, श्रीमंत, जात, धर्म असा कोणताही भेदभाव न करता सरसकट सर्वच विद्यार्थ्यांना शैक्षणिक हातभार लागावा त्यांचे भविष्य घडवण्यामध्ये आपला खारीचा वाटा असावा या उदात्त हेतूने त्यांनी आपली जन्मभूमी व तुळजापूर तालुक्यातील अन्य गावांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याचा मानस करून तो मूर्त स्वरूपात आणला जात आहे. या उपक्रमाचे सर्वत्र अभिनंदन करून आभार व्यक्त केले जात आहेत.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून टायगर ग्रुपचे पुणे जिल्हाध्यक्ष अनिकेत घुले, पुणे येथील टायगर ग्रुप चे संदीप मस्के, अजय चव्हाण, आदेश सोनवणे तर टायगर ग्रुप चे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष हर्ष भरोसे, जवाहर बाल मंच चे धाराशिव जिल्हा मुख्य समन्वयक तथा लोहारा तालुक्यातील भोसगा येथील माजी सरपंच मुकेश सोनकांबळे, टायगर ग्रुप चे सदस्य अमोल सगर, राज भंडारे, कैफ बाबा जमादार, महेश बनसोडे, अभिषेक काळे उपस्थित होते.


उपरोक्त कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संजय रेणुके, पत्रकार मेघराज किलजे, पत्रकार विजय पिसे, पत्रकार सतीश राठोड, इंदिरा काळे प्रशालेचे मुख्याध्यापक गहिनीनाथ काळे व सर्व शिक्षक वृंद, जळकोटवाडी ( नळ ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भोसले व शिक्षक वृंद, हंगरगा ( नळ ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंद, नंदगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंद आदींसह विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

छत्र्या मिळाल्यानंतर सर्वच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. त्यांना जणू गगन ठेंगणे झाल्यासारखे दिसत होते. बालकांच्या चेहऱ्यावरील आनंदच आमचे समाधान असून असे समाधान हे लाखमोलाचे असून त्याचे वर्णन शब्दात करता येण्यासारखे नाही अशी प्रतिक्रिया याप्रसंगी टायगर ग्रुप चे अभिजीत पवार, अमोल रावळकर, ओमकार बोरसे ( पाटील ) यांनी व्यक्त केली.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी जवाहर बाल मंच चे धाराशिव जिल्हा मुख्य समन्वयक मुकेश सोनकांबळे, टायगर ग्रुप चे धाराशिव जिल्हा कार्याध्यक्ष हर्ष भरोसे, चैतन्य सगर आदींनी परिश्रम घेतले.

# आदिवासी बोलीतील विलक्षीत प्रेमकथा मीमेटू बगा मंतीरु सुग्री वल्द मंगरु

गोंड आदिवासी







**– मुन्नाभाई नंदागवळी,**
येरंडी-बाराभाटी, जि. गोंदिया.
मो. ९७६४६७६४९९
(कथाकार साहित्याचे अभ्यासक आहेत.)

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आदिवासी भागात प्रेमानूळ्ळी गाव सम वेत 'बायो-बाबो' वाहून गेल्याने, मनानी खचलेला तरुण रुबाबदार मंगरु जंगलातच वास करु लागला. जंगलाजवळच दहा-बारा झुग्गीची (झोपडी) गोंडीटोला वस्ती वास्तवास राहते. एके दिवशी या वस्तीच्या चुडला पोरी (लहान मुली) व तरुण मुली आंघोळीसाठी तलावाच्या दिशेने निघाल्या, डोंगरातून तलावात पडणा-या खूपच सुंदर फेसांडलेला पाण्याचा नजराणा सुग्रीला बेधुंद करून आंघोळीसाठी मोहीत झाली, आकर्षित केल्याने सुग्रीसह सर्वच पोरी पाण्यात शिरल्या व आनंदोत्सवाने हसत खेळत रमल्या होत्या.

पण काळोखाचा ओघ, ढग काळवटलेले पाहून सर्व चूडला पोरी वस्तीकडे निघाल्या, तशी सुग्री लक्ष करत लगबगीने पाण्याबाहेर निघून चमचमणारे कातडे व पानांनी कसेबसे अंग झाकून वाटेने निघत असतांना पावसाचा भलताच वर्षाव झाला, भिजलेली सुग्री जंगलात झाडाच्या आधाराने थांबून आपले थरथरणारे शरीर न्याहाळत होती, पाऊस थांबेना, सुग्री घाबरून गेली....

पोटाची भूक, मनाला शांती, शरीराला विसावा मिळावा अन् पावसापासून बचाव करण्यासाठी तरुण वयाचा दुःखी, कष्टाळलेला मंगरु जंगलातून रानमेवा व फळे, फळभाजी आपल्या झुगीकडे पावसामुळे धावत-पळत निघत होता, तो सुध्दा मोठा विशाल वृक्षापासून बचाव करण्यासाठी त्याच पिंपळाच्या झाडाखाली थांबला, तेथेच मागच्या बाजूला थरथर कापत, हळहळ करत तरुण सुंदर सूडोल गोरी वर्णाची पोर सुग्री बसून होती, काही क्षणात मंगरु व सुग्रीची नजरानजर झाली, बोलण्याचा प्रयत्न, पण शब्द उमटत नव्हते.

तरी हिंमतीने मंगरु म्हणाला 'निम्मे के' (तुम्ही कोण)

'सुग्री मनता' ती उच्चारली,

मंगरु- 'मीमेंटू बगा मंतरु'

'महे नार' म्हणून सुग्री स्वतःबद्दल सांगत होती, तो मात्र तिला पाहून धूंद झाला होता.

तसीच सुग्री म्हणाली 'मेमेंट ही पही'

मंगरु म्हणतो 'इके हूर्'..... बोलता-बोलता एकमेकांना पसंत करु लागले.

तेव्हा तो म्हणतो निवांत जीवाने माता (त्याने प्रेमाचा प्रस्ताव ठेवला) ती एकदम हसून फूलली व प्रेमाचे बंध जूळून आले.

प्रेम बहरुन काही काळ लोटून गेला ते एकमेकांच्या अधून होवून भविष्याचा वेध घेण्यासाठी आधार हवा होता दोघांना. याच विचाराने...

मंगरु म्हणतो- 'नीम्मे नावातोंडे पेडंलू'

ती ' मंताने' (ती होकार देते) एकमेकांशी संवाद साधून, विचार करून काही दिवसांनी सुग्रीच्या गोंडीटोला येथे जाऊन दोघांनी जमलेल्या लोकांना आपल्या प्रेम प्रकरणाची विलक्षीत कथा सांगून मनातील ओझे कमी केले.

त्या गोंडीटोल्याची परंपरा जगावेगळीचजगावेगळीच, संध्याकाळ होताच जनावराचे कातडे लावलेले व पाने गुंडाळलेली आदिवासी समाजातील लोक भाले, दांडपट्टे व काठ्या घेवून गोटूल जवळ एकत्र शेकोटी पेटवून जमा झाले.

हुर्.... हुर्.... ले असा मोठा आवाज त्याठिकाणी दुमदुमला व लागलीच गोंडी देवपूजेला सुरुवात झाली, देवीला साक्षी ठेवत मंगरु व सुग्री यांचा लग्न लावायचे ठरवत परंपरेप्रमाणे लग्न लावल्या गेले.

रे.... ना.... रे.... ना
रेरे .... ना.... रेरे.... ना असा गोंडी विवाह महोत्सव साजरा करतात. तर कधी मधी

किल्लं.... किल्लं.... आवाज करत हातातील काठ्या वगैरे जमीनीवर ठोकतात.

तपन तपे..... हिवरी-पिवरी....

हीला बासींग बांधा, करा नवरी....

अशा रितीरिवाजाने व परंपरागत लग्नाच्या बंधनात अडकतात. (सुग्री वल्द मंगरु) सुग्री संग मंगरु यांना तो जंगलातील आदिवासी समाज स्विकारतो, अन् त्यांच्या सुखी जीवनाला सुरुवात होते. यवनाची कळी उमलू लागते.

सुखीसंसाराचागाळाचालविण्यासाठी सुग्री व मंगरु अनेक दिवसांनी खोलवर शिरतात. फळे फूले, भाज्या रानमेवा गोळा करण्यासाठी जाताना पाहून त्यांच्या मार्गावर गोंडीटोल्यातील लबाड-धूर्त, नराधमांनी मारण्याचा कट आधीच बांधला होता. त्या संधीचा आज सोने करु या बेताने जंगलातच सुग्री आणि मंगरु यांना घेरले, मंगरुला भाले टोचत व काठ्या मारत देत वार करु लागले, तोच रक्तबंबाळ मंगरु जमिनीवर कोसळला पाहून सुग्री ढसा-ढसा रडून गयावया करु लागली. संधी साधता काही नराधमांनी बळजबरीने निरदोष सुग्रीवर अतिप्रसंग व अत्याचार केला. त्यामुळे दोघांनाही वेदना सहन होत नव्हत्या, डोळ्यातून आसवांचा समुद्र वाहतच सुग्री व मंगरु यांना प्राण सोडला, दोघेही जीवनातून मुक्त झाले, सुग्री नेहमी मंगरुला म्हणायची असे आपण कोठेही गेलो तरी एकमेकांची साथ सोडायची नाही कदाचित नियतीला हेच मान्य असावे....!



**– प्रा. मुन्नाभाई नंदागवळी,**
**येरंडी-बाराभाटी, जि. गोंदिया.**
**मो. ९७६४६७६४९९**
**(कथाकार साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

# श्रध्दा व निष्ठा वृध्दिंगतासाठी वर्षावास !







**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकानुकम्पाय, अत्थाय हिताय देवमनुस्सानं ।**

**देसेथ भिक्खवे धम्मं, अदिकल्याणं मज्झकल्याणं, परियोसानकल्याण, सात्थ सब्यञ्जनं ब्रम्हचरियं पकासेथ।।**

तथागतांनी धम्म प्रचार व प्रसारासाठी भिक्खूंना आदेश दिला. भिख्खूहो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, मानवांना कल्याणकारी, धम्मपदेश करण्यात तुम्ही प्रवृत्त व्हा, प्रारंभी कल्याणपद, मध्यंतरी कल्याणपद आणि शेवटीही कल्याणपद अशा या धम्म मार्गाचा लोकांना उपदेश करा. वर्षावास म्हणजे पावसाळ्यातील निवास आषाढी पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत, या तीन महिन्यात फक्त बुद्ध विहारात जीवन व्यतीत करणे. या काळात भिक्खूंनी धम्म-प्रचार-प्रसारासाठी स्वतःला तयार करणे, बौध्द उपासक/उपासिकांना धम्माचं महत्व सांगणे, ध्यान-साधना करणे, धम्मदान स्विकारणे आदि नित्यक्रम करावे असा आदेश तथागतांनी भिक्षूसंघास दिला. त्याप्रमाणे ते आचरण करीत असत. यालाच वर्षावास म्हणण्याची प्रथा सुरु झाली, ती आजतागायत अविरत सुरु आहे यात खंड नाही. इथेच वर्षावासाचं महत्व सर्वश्रुत आहे. तथागतांनी बुद्धत्व प्राप्तीनंतर पंचवर्गीय संन्याशांना आपला अष्टांगिक मार्ग, प्रतीत्य समुत्पाद, चार आर्यसत्य हे समजावून दिल्यानंतर त्यांना ते कळले. इसिपतन वन (आधुनिक सारनाथ), वाराणसी येथे अनुत्तर असे पहिले धम्मचक्र प्रवर्तन केले. आश्विन पौर्णिमेला एकसष्ठ अर्हत भिक्षुंच्या समवेत धम्म चक्राची घोषणा केली. चारही दिशांना जाऊन बहुजन हिताय - बहुजन सुखाय धम्माची अशी सिंहगर्जना केली.

तथागत बुध्दांची पहिली धम्मसभा आषाढी पौर्णिमेला झाली. पुढे भिख्खूसंघाच्या निर्मीतीनंतर दरवर्षी याच कालावधीत उपासक वर्षावास करतात. याची सुरुवात आषाढी पौर्णिमेला होते आणि याच काळात पंढरीची वारी ही सुरु होते, हे निव्वळ योगायोग नाही. भगवान बुद्धाच्या काळात बुद्धांनी सर्व भिक्षूंना धम्माचा प्रसार करण्याचे आदेश दिले आणि सर्व बौद्ध भिख्खू या कामात गुंतले होते, परंतु असे केल्याने त्यांना बऱ्याच संकटांना आणि विशेषतः पावसाळ्यात नद्यांमध्ये अनेक संकटांना सामोरे जावे लागे. पुरामुळे बौद्ध भिख्खू वाहून जात आणि त्यांच्या चालण्याने शेतातील पिकांचे नुकसान होत त्यांनी हे तथागतांना सांगितले, बुद्धांनी आदेश दिला की आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विनी पौर्णिमेपर्यंत सर्व भिक्षूंनी एकाच ठिकाणी रहावे, भिक्षेसाठी गावात जाऊ नये. एकाच ठिकाणी राहून धम्माचे पठण अध्ययन करावे. जर गरज पडली तर भिक्षू आपल्या गुरूंकडून जास्तीत जास्त एका आठवड्याचा वेळ घेऊन विहारातून बाहेर जाऊ शकतात, भगवान बुद्ध काळापासून वर्षावास अस्तित्वात आहे. तथागतांनी ४५ वर्षावास श्रावस्ती, जेतवन, वैशाली, राजगृह इत्यादी ठिकाणी केले. अशा प्राचीन गुरू-शिष्य परंपरेचे पालन आजही भारतात आणि बौद्धराष्ट्र थायलंड, म्यानमार, श्रीलंका, कंबोडिया आणि बांगलादेश पालन करतात.

आषाढ पौर्णिमेला वर्षावास सुरू होतो आणि अश्विन पौर्णिमेला संपन्न होतो, बौध्द धम्मात वर्षावासाला अनन्य साधारण महत्व आहे, सर्व बौध्द उपासक उपासिकांनी या तीन महिन्याच्या कालावधीत स्वःताच्या घरी रोज बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या बुध्द आणि त्यांचा धम्म या पुस्तकाचे किंवा अन्य बुद्ध धम्माशी संबंधित पुस्तकाचे रोज सामुहिक वाचन करून त्यावर मनन चिंतन करावे व त्याचे आपल्या जिवनात अनुकरण केले पाहिजे, नियमितपणे शेजारच्या बुध्दविहारात जावून धम्म श्रवण करावा व धम्ममार्गावर आरूढ व्हावे, धम्मदान द्यावे, उपोसथ व्रत घेऊन अष्टशिलाचे पालन करून सदगुणाचा पाया मजबूत करावा, आपल्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबास यानुसार आचरण करण्यास प्रोत्साहित केल्यास बौध्द उपासकांचा मोठा संघ तयार होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या प्रबुध्द भारताचे दिव्य स्वप्न साकार होण्यास हातभार लागेल.

बुद्धांनी शिकवले की उपोसथ दिवस म्हणजे अशुद्ध मनाची शुद्धता करण्याचा दिवस होय, उपोसथ किंवा उपोस्थ या शब्दाचा अर्थ उप+स्था म्हणजे एकत्र बसणे होय, भिक्षुसंघाची एकसंघपणा टिकवून राहण्यासाठी उपोसथ विधी खूप महत्त्वाचा मानला गेला. उपोसथ विधी बुद्ध काळापासून अस्तित्वात आहे आणि बौद्ध देशांमध्ये उपोसथ विधी श्रद्धापूर्वक पाळला जातो. अमावस्या आणि पौर्णिमेच्या दिवशी भिख्खू पटिमोक्खा (आचारसंहितेचे नियम) यांचे पाक्षिक कबुलीजबाब आणि पाठ होते. या दिवशी बौद्ध उपासक आणि भन्ते धम्म अध्ययन आणि ध्यानाची तीव्रता आणखीन वाढवतात. विनयासंबधी जर आचारात काही दोष आला असेल तर उपोसथ दिनी भन्ते सर्वांसमोर कबुलीजबाब देत असत व संघ नियमानुसार त्यांना पुढील कारवाईस समोर जावे लागत. हा विधी खूप पवित्र मानला जाई, आजही त्याचे पालन केले जाते.

धम्माप्रती वचनबद्ध उपासक गृहस्थ पंचशील, दहा परिमिता, अष्टांगिक मार्गाचे पालन करतात धम्म आचरणात उत्साह जागृत होण्याकरिता समाधी मार्गाचे, ध्यानाचे अवलंबन करतात. जेव्हा शक्य असेल तेव्हा उपासक या दिवसाचा उपयोग स्थानिक विहारात जाण्याची संधी म्हणून करतात. या दिनी संघाला विशेष दान अर्पण केले जाते, धम्म प्रवचन ऐकले जाते आणि रात्री उशिरापर्यंत धम्म बांधवा सोबत ध्यान-धारणा केली जाते. जे उपासक विहारात जाऊ शकत नाहीत अशांना ही उपोसथ दिन संधी देतो कि, आपले ध्यान करण्याचे प्रयत्न वाढवावे कारण या पवित्र दिनी जगातील हजारो उपासक ध्यान धारणेचा अभ्यासात वुद्धी होण्याच्या दिशेने पाऊल टाकतात.

तथागत बुद्धांच्या आदेशानुसार भिक्खुसंघ धम्म प्रचारासाठी सर्व ऋतूत चारही दिशांना पायी फिरत असत, या तिन्ही ऋतुत त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे, नैसर्गिक संकटांचा सामना करून प्रतिकूल परिस्थितीतही ते धम्माचा प्रचार-प्रसार करीत असत. हे सर्व लक्षात घेऊन तथागत बुद्धांनी भिख्खू संघाला आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत, एकाच ठिकाणी विहारात राहून धम्माचा अधिक अभ्यास करीत आसपासच्या परिसरातील उपासकांना धम्मज्ञान देण्याबाबत सूचना दिल्या, आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा हा काळ वर्षावास म्हणुन तेव्हापासुन संपन्न होऊ लागला (वर्षावास म्हणजे पावसाळयातील निवास) वर्षावास काळात श्रध्दावान उपासक विहारात जावून धम्म-श्रवण करतात, विहारात भिख्खूंना श्रध्दाभावनेने भोजनदान करतात व आजही सातत्याने सुरु असतात. फार महत्व आहे या पोर्णिमेचेआपण आपली संस्कृती जपली पाहिजे. आषाढ पौर्णिमेच्या अर्थात गुरु पौर्णिमेच्या सर्व उपासक/उपासिकांना मंगलमय शुभेच्छा!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# गोपाळकाल्याने आषाढी यात्रेची सांगता; पालख्यांचा परतीचा प्रवास सुरु

## ‘गोपाळकाला गोड झाला, गोपाळाने गोड केला’च्या जयघोषाने गोपाळपूरनगरी वारकऱ्यांच्या गजराने दुमदुमली









**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळकाला गोड झाला, गोपाळाने गोड केला या जयघोषात अवघी श्रीकृष्णनगरी म्हणजेच गोपाळपूरनगरी लाखो वारकऱ्यांच्या गजराने दुमदुमून गेली. ज्ञानेश्वर माऊली तुकारामाच्या गजरात गोपाळपूरात मानाच्या पालख्यांसह सर्व संताच्या पालख्या दाखल झाल्या आणि गोपाळकाला केल्यानंतर श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी विठ्ठल मंदीरात आल्या. मानाच्या पालख्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले आणि परतीचा प्रवास सुरु केला.

पोर्णिमेच्या दिवशी परंपरेनुसार गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथे मानाची अंमळनेरकर महाराजांची दिंडी काल्याच्या उत्सवासाठी पहाटे ५.०० वाजता भगवान श्रीकृष्ण मंदिरात दाखल झाली. त्यानंतर भजन झाले. तर शेगावच्या श्री संत गजानन महाराज पालखीचे पहाटे ४.०० वाजता गोपाळपूरात आगमन झाले. पहाटेपासूनच एकामागोमाग एक अशा विविध सुमारे ४५० संतांच्या दिंड्या, पालख्या विठ्ठलनामाचा गजर करीत गोपाळपुरात दाखल झाल्या होत्या.

सकाळी ९.०० च्या सुमारास जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांची तर १०.०० च्या सुमारास संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पालखी सोहळे गोपाळपुरात दाखल झाले. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या तसेच श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. मंदिराजवळ पालख्या विसावल्या होत्या. या पालख्यासह संत सोपानकाका, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत गोरोबा, संत एकनाथ महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत निळोबाराय, चांगावटेश्वर देवस्थान यांच्यासह अन्य संतांच्या पालख्यांचे व दिड्यांचे गोपाळपुरात आगमन झाले.

तत्पुर्वी गोपाळपुर येथील श्रीकृष्ण मंदीरात पहाटे २.३० वाजता विश्वस्तांच्या हस्ते पूजा करण्यात आली. पूजा झाल्यानंतर पहाटे ३.३० वाजता श्रीकृष्ण मंदीर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रध्देने श्री गोपाळकृष्णाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घातली तसेच एकमेकांना प्रेमाने लाह्यांचा काला भरवून गळाभेट घेतली. श्रीकृष्ण मंदिर समितीच्या वतीने प्रसाद म्हणून लाह्यांच्या काल्याचे वाटप करण्यात आले.

गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच उज्वला बनसोडे, ग्रामसेविका ज्योती पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी पालख्यांचे व दिड्यांचे स्वागत केले. गोपाळपूर ग्राम पंचायतीच्या वतीने स्वच्छ पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था, हिरकणी कक्ष, प्लॅस्टिक संकलन केंद्र, तात्पुरते शौचालय, निवारा शेड,आरोग्य कक्ष आदी सुविधा वारकरी भाविकांसाठी उपलब्ध केल्या होत्या. यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीनेही चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या सोहळ्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, प्रांताधिकारी सचिन इथापे,उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. गोपाळपूर येथील गोपाळ कृष्ण मंदीर समितीच्या वतीने मंदिरात आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांचा सत्कार गोपाळ कृष्ण मंदिर समितीच्या वतीने गोपाळ कृष्ण मंदिर समितीचे अध्यक्ष दिलीप गुरव यांच्या हस्ते करण्यात आला.

**संत-देव भेटीचा सोहळा**

गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल झाल्या व सर्व संताच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात आल्या.यावेळी देवाची आणि संताची अनुपम भेट घडवून आणण्यात आली. श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतल्यावर हा संतदेव भेटीचा सोहळा पार पडला. यानंतर पालख्या परतीच्या मार्गावर रवाना झाल्या.

तत्पूर्वी सकाळी ६.०० वाजता श्री.संत एकनाथ महाराजांच्या दिंडीचा काला संपन्न झाला. त्यानंतर श्री.संत निवृत्तीनाथ महाराज संस्थान त्र्यंबकेश्वर, श्री.संत चांगावटेश्वर देवस्थान सासवड, श्री.संत सोपानदेव महाराज संस्थान सासवड, श्री.संत मुक्ताबाई संस्थान मुक्ताईनगर, श्री.संत निळोबाराय संस्थान पिंपळनेर, श्री.विठ्ठल रूख्माई संस्थान कौंडण्यपूर, श्री.संत तुकाराम महाराज संस्थान देहू, श्री.संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी, श्री.संत नामदेव महाराज संस्थान पंढरपूर या संतांचा देव भेटीचा सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात पार पाडला.

मंदीर समितीच्या वतीने पादुकांचे पुजन व मानाच्या पालख्यांचे मानकरी यांचे उपरणे,श्रीफळ व हार देवून सत्कार केला. यावेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतलाताई नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ तसेच मानाचे पालख्यांचे पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त उपस्थित होते. जातो माघारी पंढरीनाथा। तुझे दर्शन झाले आता ।। म्हणत जड अंत:करणाने संताच्या पालख्यांनी व वारकऱ्यांनी परतीचा प्रवास सुरु केला.

**बुधवारी प्रक्षाळपूजा**

पंढरपूर येथील आषाढी यात्रेत भाविकांना दर्शन देण्यासाठी श्री विठ्ठल- रुक्मिणीमाता अहोरात्र उभे असतात.या कालावधीत देवाचे नित्योपचार बंद असतात. श्री विठ्ठलाचे नवरात्र असल्याने पलंग काढण्यात आलेला असतो. त्यामुळे बुधवार (ता.१६) श्रींची प्रक्षाळपूजा करण्यात येणार आहे, अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# शहापूरच्या दमाणी शाळेमध्ये अत्यंत घृणास्पद प्रकार
# पाळी आल्याच्या संशयातून विवस्त्र करत विद्यार्थीनींची तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/प्रफुल्ल शेवाळे : दि. ९ जुलै रोजी शहापूर (जि.ठाणे ) मधील दमाणी शाळेमध्ये अंत्यनात घृणा स्पद प्रकार पाहायला मिळाला आहे. सदर घटनेने शहापूर तालुका पुर्ता हादरून गेला आहे आणि संपूर्ण तालुक्यात भीतीचे वातावरण उभं राहील आहे.

विद्यार्थिनींची मासिक पाळी तपासण्याच्या बहाण्याने त्यांना विवस्त्र करून छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा प्रकार ठाणे जिल्ह्यातील शहापूर शहरातील नामांकित आर एस दमाणी इंग्लिश स्कूलमध्ये घडला. याप्रकरणी पीडित विद्यार्थिनींच्या पालकांच्या तक्रारीवरून मुख्यध्यापिकेसह आठ जणांवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये पाच शिक्षिका, दोन महिला कर्मचारी, एक शिपायाचा समावेश आहे.

घटनेची माहिती समजताच पालकांनी शाळा गाठत मुलींसोबत घडलेल्या प्रकराचा जाब विचारत गोंधळ घातला. दुसरीकडे इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थिनींना मासिक पाळी या नैसर्गिक प्रक्रियेबाबत योग्य शिक्षण देण्याऐवजी त्यांच्यावर मानसिक परिणाम होईल अशा रीतीने या विद्यार्थिनींना विवस्त्र करण्याचा लज्जास्पद प्रकार केल्याचा आरोप केला.

बुधवारी पालक आणि शालेय प्रशासन यांच्यात मोठा वाद झाला. दमाणी स्कूलमधील मुख्यध्यापिकेवर गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत येथून जाणार नसल्याची भूमिका पालकांनी घेतली.

सदर घटनेचे पडसाद संपूर्ण शहापूर तालुक्यात उमटले गेल्याचे पहायला मिळाले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस चे महिला जिल्हाध्यक्षा सौ. कल्पना तारमळे यांनी शाळेमध्ये जमा झालेल्या पालकांना सदर प्रकरण राज्य महिला आयोग यांच्या कडे तात्काळ सादर करू असं आश्वासन दिलं आणि याचं धर्तीवर आज दुपारी राज्य महिला आयोग अध्यक्षा सौ. रुपाली चाकणकर यांनी शहापूर येथे धाव घेतली... याप्रसंगी पोलिसांनी चोख योग्य ती कायदेशीर कारवाई करत विद्यार्थी वर्गांचे नुकसान होता कामा नये अशा सूचना चाकणकर यांनी दिल्या आहेत.तसेच विद्यार्थनी व पालक यांचं योग्य प्रकारे समुपदेशन होणं गरजेचं आहे. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडणार नाहीत याची दक्षता नक्कीच घेतली जाईल असं सौ रुपाली चाकणकर यांनी म्हटलं आहे.

# सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माळशिरस तालुक्यातील चार शाखा अधिकारी निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रशासक कुंदन भोळे काम पाहत आहेत. कार्यक्रम अधिकारी श्री राजेंद्र शिंदे आहेत. गेल्या दोन वर्षापासून सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची प्रतिमा मलि माळशिरस तालुक्यातील खोट्या सोन्यावर खरी कर्ज दिले आहे न झालेली आहे. सध्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खातरजमा केल्यानंतर माळशिरस तालुक्यातील शाखेमध्ये सोन्याच्या कर्जकारणातील सोने पिशव्या उघडल्यानंतर धक्कादायक प्रकार बाहेर आलेला आहे. सध्या बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खातरजमा केल्यानंतर माळशिरस तालुक्यातील शाखेमध्ये सोन्याच्या कर्जकारणातील सोन्या पिशव्या उघडल्यानंतर धक्कादायक प्रकार बाहेर आलेला आहेत त्यामुळे माळशिरस तालुक्यातील चार शाखा अधिकारी निलंबित केलेले आहे माळशिरस तालुक्यातील खोट्या सोन्यावर खरी कर्ज दिले असेल तर त्यामध्ये खातेदार, शाखाधिकारी व बँकेचा सोनार यांची संगणमत आहे का? हे पाहणे गरजेचे आहे. कोण ठरवणार बळीचा बकरा, अशी सहकार खात्यामध्ये चर्चा सुरू आहे.

माळशिरस तालुक्यातील चार शाखा अधिकारी यांच्याकडील पदभार काढून घेऊन त्यांना सोलापूर येथे चौकशीसाठी बोलावली असल्याचे खात्याला एक माहिती गोपनीय सूत्राकडून मिळालेली आ सदरचा शाखाधिकारी यांची कुसुम चौकशी केली जाणार आहे जर शाखा अधिकारी दोषी असतील तर त्यांच्यावर चौकशी करून प्रशासकीय कारवाई केली जाणार आहे चार शाखे पैकी एका शाखेची प्रकरण पोलिस स्टेशन कडे दाखल करण्याच्या हालचाली सुरू आहे यामध्ये खातेदार वेगवेगळी उत्तरे देत आहेत शाखा अधिकारी यांनी





हात झटकून तोंडावर बोट हाताची घडी घातलेली आहे सोनार मात्र सर्व काही मीच केलेले आहे असे सांगत आहे . दबाव पोटी का खरंच? त्यांनी कृत केलेली आहे याची सर्व खातरजमा झाल्यानंतर खरा प्रकार बाहेर येणार आहे.

+सध्या तरी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खोट्या सोन्यावर खरे खरे घेणारी खातेदार व त्यांना कर्ज देणारी शाखाधिकारी व सोन्याची पडताळणी करणारा सोनार या सर्वांच्या चौकशीकडे तालुक्यातील खातेदार कर्जदार यांचे लक्ष लागून राहिले आहे बँकेमध्ये दिलेली खरे सोने खोटे कसे झाले असा ज्यावेळेस खातेदार सांगावा करीत आहेत त्या वेळेला प्रशासन गप्प आहे खर आहे का याचा उलगडा होईपर्यंत संशयित वातावरण निर्माण झाले आहे त्यामुळे सहकार खात्यातील बँकावरील विश्वास कमी होणार आहे जिल्हा मध्यवर्ती बँक शेतकरी संलग्न असल्याने या बँकेने दूध कब दूध पाणी का पाणी करणे गरजेचे आहे अन्यथा शेतकरी सभासद याचा विश्वास जिल्हा मध्यवर्ती बँकेवर राहणार नाही अशी खातेदार कर्जदार ठेवीदार यांच्यामधून चर्चा सुरू आहे.

# शेतकरी कर्ज माफीची योग्य वेळ कधी येणार : नळदुर्ग येथे शेतकरी संघर्ष समितीचा महाराष्ट्र सरकारला खडा सवाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याना कर्ज माफी देवून शेतकऱ्याचा सात बारा कोरा करणार असे जाहीरनाम्या द्वारे अश्वासन देवून राज्याच्या सत्तेवर आलेले देवेंद्र फडणविस यांच्या सरकारला शेतकऱ्यांचा विसर पडला दिसून येत असून आता राज्याचे मुख्यमंत्री म्हणतात योग्य वेळ आल्यावर शेतकऱ्याना कर्ज माफी देऊ मग ती योग्य वेळ कधी येणार शेतकरी मेल्यावर..?असा खडा सवाल नळदुर्ग ता. तुळजापूर येथे शेतकरी संघर्ष समितीने रास्ता रोको आंदोलनात केला.

शेतकरी संघर्ष समितीचे नेते सरदारसिंग ठाकूर, दिलीप जोशी यांच्या प्रमुख नेतित्वाखाली नळदुर्ग येथे राष्ट्रीय महामार्गावर बस स्थानकांच्या समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात शेतकऱ्याना कर्ज माफी द्यावी, सन - २०२०-२०२१ चा पिक विमा वाटप करावा, उसाचे थकीत बिल द्यावे,शेतकऱ्यावर पोलीस बळाचा वापर करून अन्याय करणाऱ्या पोलीस कर्मचार्यावर कारवाई करावी, शेतकरी अनुदानाचे वाटप करावे आदीसह विविध जिव्हाळ्याच्या मागण्यासाठी दि.८ जुलै २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वा.कर्ज माफ़ी मिळालीचं पाहीजे,शेती आमच्या हक्काची नाही कोणाच्या बापाची असा घोषणा देत शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने नळदुर्ग बसस्थानका समोर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या प्रसंगी बोलताना शेतकरी संघर्ष समितीचे नेते दिलीप जोशी यानी वरिल प्रश्न उपस्थित केला.

यावेळी सरदारसिंग ठाकूर,महादेव बिराजदार, श्रीमंत फडतरे आदिची ही भाषणे झाली.यावेळी नळदुर्ग येथील ग्राम महसुल अधिकारी संध्या कुलकर्णी यानी सदर मागण्याचे निवेदन स्विकारले.

या रास्तारोको आंदोलनात मानसिंग ठाकूर, गुलाब शिंदे, संतोष फडतरे, तोलू शेख, बंडू मरे, काशिनाथ कळे,पंडित पाटील, गणपत सुरवसे, विरपक्ष माशाळकर,अशोक जमादार, हरिदास भोसले, अकाश देशमुख, राघू देशमुख, संतोष पाटील, राजेंद्र सुरवसे, प्रदिप सुरवसे, श्रीकांत पोतदार,शांतेश्वर पाटील,धन्नाप्पा पाटील, विजयकुमार पाटील, प्रतापसिंगठाकूर,अजमोदिन शेख सह शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.



## अमेरिका स्थित माजी विद्यार्थ्यांची स्वेरीला सदिच्छा भेट

## नियमितचा अभ्यास व विविध उपक्रमात सहभागामुळे आत्मविश्वास वाढला

# स्वेरीने करून घेतलेल्या परिश्रमाचे चीज झाले : माजी विद्यार्थी व गुगलचे सनी तोडकरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ‘डॉ. रोंगे सरांनी २००८ साली जे आमच्याकडून परिश्रम करून घेतले त्याचे आज चीज झाले असून आमच्या आयुष्याची पायाभरणी अगदी उत्तम केल्यामुळे आमच्या यशाची इमारत आज उंच शिखरावर पोहोचली आहे.’ असे प्रतिपादन अमेरिकेत मध्ये स्थायिक झालेले स्वेरीचे माजी विद्यार्थी सनी तोडकरी यांनी व्यक्त केले.

१९९८ साली संस्थेचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे सरांनी गोपाळपूरच्या माळरानावर केवळ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी तंत्रशिक्षणाचे द्वार खुले केले. तेंव्हापासून आजपर्यंत जवळपास २७ वर्षात शिक्षणात विविध उपक्रम राबवत ‘पंढरपूर पॅटर्न’ यशस्वी पणे राबवित आहेत. अशातच शेकडो विद्यार्थी करिअरसाठी परदेशात स्थायिक झाली आहेत. सन २००७ मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून उत्तीर्ण झालेले व सध्या गुगल या सॉफ्टवेअर कंपनीत कार्यरत असलेले माजी विद्यार्थी सनी देविदास तोडकरी हे आपल्या पत्नीसह सदिच्छा भेटीच्या निमित्ताने स्वेरीत आले होते. याप्रसंगी स्वेरीमध्ये त्यांनी विद्यार्थी दशेत करून घेतलेल्या परिश्रमामुळे हे चांगले दिवस पाहायला मिळाले असल्याचे



आनंदाने सांगितले. मुळचे महूद (पंढरपूर) मधील असणारे सनी तोडकरी हे गेल्या ६ वर्षांपासून कॅलिफोर्निया (युनायटेड स्टेट्स) येथे गुगलमध्ये कार्यरत आहेत. त्यांना निवेदिता अनिल वडगावकर ह्या सहचारिणी म्हणून लाभल्या असून त्या देखील स्वेरीच्याच माजी विद्यार्थिनी आहेत. सौ.निवेदिता तोडकरी ह्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातून २००८ बॅचच्या पासआउट विद्यार्थिनी आहेत. दोघेही भारतात आले असताना त्यांनी स्वेरीला भेट दिली. तोडकरी दाम्पत्यांचे स्वेरीत सचिव प्रा. सुरज रोंगे यांनी स्वागत केले. तोडकरी दाम्पत्यांनी आनंदाने सर्व विभागांना भेट देवून प्रगतीचा आलेख जाणून घेतला. यावेळी सनी तोडकरी मनसोक्त व्यक्त होत होते. ते म्हणाले ‘मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून उत्तीर्ण असूनही सध्या गुगल या सॉफ्टवेअर कंपनीत मी कार्यरत आहे. कोअर ब्रँच मधून घेतलेल्या शिक्षणातून आपण इंजिनिअरिंगच्या कोणत्याही क्षेत्रात करिअर करू शकतो. शिक्षण स्वेरीमध्ये ट्रिपलपीई ने मला खूप मदत केली असून प्रामाणिकपणे परिश्रम केल्यास काहीही अवघड नसते’ हे डॉ. रोंगे सरांचे वाक्य कायमचे मनात घर करून राहिले आहे. ट्रिपलपीई मध्ये दररोज ५ सेटेंन्स, प्रॉक्टर हे सर्व प्रामाणिक पणे फॉलो केले. विद्यार्थ्यांच्या जीवनात कॉलेजने दिलेल्या गोष्टी आपल्या भल्यासाठीच असतात हे कॉलेज संपल्यावर ज्यावेळी नोकरीसाठी, मुलाखतीसाठी जातो तेंव्हा समजते. केवळ ट्रिपलपीई मुळे मला लार्सन अँड टुब्रो, सुझलोन,महिंद्रा इत्यादी चांगल्या कंपन्यांमध्ये भरती होण्यास मदत झाली. दुसऱ्या वर्षात असताना डॉ. रोंगे सरांनी आम्हा विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करण्यास सांगितले. तसेच नियमितचा अभ्यास व विविध उपक्रमात सहभाग घेतल्यामुळे आत्म विश्वास देखील वाढला. जीवनात संयम राखणे, स्वतःवर विश्वास ठेवून कार्य करणे तसेच ’नम्रपणे सादरीकरण केल्यास आपल्या कार्याची दखल घेतली जाते’ हा कानमंत्र आयुष्यात उपयोगी ठरला’, असे सांगून विद्यार्थी दशेतील अनेक आठवणी सांगितल्या. यावेळी माजी विद्यार्थिनी निवेदिता तोडकरी यांनी देखील स्वेरीच्या आदरयुक्त शिस्तिचा आयुष्यात फायदा झाल्याचे आवर्जून सांगितले. यावेळी स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, सचिव प्रा. सुरज रोंगे, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ. श्रीकृष्ण भोसले, डॉ. सुमंत आनंद, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रा. अविनाश मोटे, डॉ. सचिन खोमणे यांच्यासह इतर आदी प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

## थोडक्यात...

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : शिवाजी चौक विनायक लॉज येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.वी.४१७० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २९ ते ३० जून दरम्यान घडली.याप्रकरणी तन्मय आशिष वाडे (वय-३०,रा. उत्तर सदर बझार, सतनाम चौक) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल परीट हे करीत आहेत.

### एसटी बस मध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने रक्कम पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : सोलापूर बस स्टॅन्ड येथे सोलापूर ते कुरळवाडी जाणाऱ्या एसटी बस मध्ये फिर्यादी सावता नारायण राऊत (वय-३३,मु.पोस्ट उपळाई खुर्द,ता.माढा, जिल्हा सोलापूर) हे चढत असताना अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या त्यांच्या खिशातील नऊ हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याची घटना २५ जून रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सावता राऊत यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चुंगे हे करीत आहेत.

### शेळगी ब्रिजच्या सर्विस रोडवर अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू ; अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : शेळगी ब्रिज सर्विस रस्त्यावर सोलापूर येथे फिर्यादी अजय राजशेखर स्वामी (वय-३३,रा.श्रद्धा सबुरी अपार्टमेंट शेळगी) यांच्या वडिलांना यांचे वडील राजशेखर स्वामी (वय-६२) यांना कोणत्यातरी अज्ञात वाहनाने धडक मारून गंभीर जखमी करून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत होऊन पळून गेल्याची फिर्याद अजय स्वामी यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १ जुलै रोजी रात्री सव्वा सात वाजण्याच्या सुमारास घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल वाघमारे हे करीत आहेत.

# द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान देण्यासाठी आ. अभिजित पाटील आक्रमक

## विरोधक आमदारांना अधिवेशनात प्रश्न मांडू दिले जात नसल्याचाच केला थेट आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

- **तुटपुंजे द्राक्ष उत्पादकांनाच नुकसान भरपाई देण्याची सरकारची तयारी**
- **आ. अभिजीत पाटील यांचे कडून जास्तीत जास्त नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणीचांच जोर कायम**
- **द्राक्ष बागायतदारांच्या नुकसानीबाबत आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत आवाज उठवला**
- **सत्ताधारी पक्षात नाही म्हणून आम्हाला बोलायची संधी दिली जात नाही. मनमानी कारभार खपवून घेतला जाणार नाही – आमदार अभिजीत पाटील.**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील आणि पंढरपूर तालुक्यातील कासेगाव व माढा तालुक्यातील मानेगाव या परिसरातील द्राक्ष बागायतदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, जवळपास २०,००० हेक्टर क्षेत्र या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले आहे. मात्र प्रशासनाने फक्त ३३ हेक्टर क्षेत्राचेच पंचनामे केल्याचे गंभीर वास्तव आमदार अभिजीत आबा पाटील यांनी आज विधिमंडळात मांडले.

सत्ताधारी पक्षात नाही म्हणून आम्हाला बोलायची संधी दिली जात नाही. मनमानी कारभार खपवून घेतला जाणार नाही, असा जोरदार आक्रमक सूर आमदार पाटील यांनी धरला. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा देत त्यांनी शासनाचे लक्ष या गंभीर विषयाकडे वेधले. त्यांनी प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत संपूर्ण नुकसानग्रस्त क्षेत्राचा पंचनामा करून सरसकट मदत देण्याची मागणी केली.

या मुद्द्यावरून सभागृहात काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र आमदार पाटील यांनी ठाम भूमिका घेत शेतकऱ्यांचा



आवाज पोहोचवण्याचा प्रयत्न केला.

शेतकऱ्यांच्या अडचणींवर ठोस उपाययोजना झाल्याशिवाय शांत बसणार नाही, असा निर्धार आमदार पाटील यांनी व्यक्त केला.



## वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

निफाड/प्रतिनिधी : न्यायमूर्ती रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल येथे गुरुपौर्णिमा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी सरस्वती व वेध व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करून विद्यालयातील सर्व शिक्षकांचे बाळ गोपाळांनी औक्षण करून गुरूंच्या चरणी नतमस्तक झाले व गुरूंचे आशीर्वाद घेतले यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी गुरु विषयी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते नववीच्या मुलांची वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. तसेच नर्सरी ते दहावी मुलांनी सहभाग नोंदविला.

प्राचार्य सौ पल्लवी सानप यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला संस्थेच्या सर्व विश्वस्तांनी सर्व शिक्षकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

# श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान पायथ्याशी गोल रिंगण सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : तालुक्यातील श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान पायथ्याशी तिन ठिकाणच्या घोडा, रथ, पालखी व हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत गुरुवार दि. १० रोजी सायं ५ वाजता गोल रिंगण सोहळा पार पडला. महाराष्ट्र कर्नाटक सिमेवरील श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी औराद शहा येथील घोडा, पादुका रथ पालखी सोहळा प्रथम आळंदी ते पंढरपूर पायी चालत पार पडला. पंढरपूर येथून औराद शहा. येथे येऊन पुढे तिनं दिवस पायी रथ पालखी श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान कडे रवाना झाली आहे. मंगळवार दि. ८ रोजी सकाळी औराद शहा येथून पायी दिंडी सोहळा सुरू झाला होता. निलंगा, कासार शिर्शी,तुरोरी मार्गे रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी आली. कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यातील एकंबा गावातील सदगुरू उज्वलानंद महाराज यांची पादुका पालखी ही गुरूवार दि. १० रोजी सकाळी निघून मळगी, चिंचकोट कोळसूर मार्गे तुरोरी येथे येऊन निलंगा तालुक्यातील औराद येथून येणाऱ्या पालखी सोहळ्यात सहभागी होऊन रिंगण सोहळ्यात सहभागी झाले आहेत. कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यातील नवचंदवाडी येथील पादुका पालखी पायी सोहळा हा जोगेवाडी, उजळंब, एकंबा, होन्नाळी, हंद्राळ आर, चेंडकापूर, घोटाळ मार्गे उमरगा तालुक्यातील तलमोड मार्गे राष्ट्रीय महामार्गालगत पायी प्रवास करीत श्री क्षेत्र अचलबेट देवस्थान पायथ्याशी सायं. ४:३० वा. पोहचली होती.देवस्थानच्या पायथ्याशी राष्ट्रीय महामार्गालगत गोल रिंगण सोहळ्यासाठी मैदान तयार करण्यात आले होते. या ठिकाणी पालखी ठेवण्यासाठी स्टेज व स्पिकरची व्यवस्था करण्यात आली होती. या सोहळ्याला दोन राज्यांतील आठ जिल्ह्यांतील हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत रिंगण सोहळा पार पडला.



## वेतन थकल्याने नवोदय विद्यामंदिर व महाविद्यालयाच्या शिक्षकांचे सामुदायिक रजा आंदोलन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या मोंहडुळ येथील नवोदय विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचे वेतन थकल्याने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सामुदायिक रजा आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

नवोदय विद्यामंदिर येथे मोंहडुळ परिसरातील खेडी, गाव, पाड्यातील ५ ते १२ वी पर्यंतचे ११२ विद्यार्थ्यी शिक्षण घेत असुन ९ व १३ वर्षापासून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी इमाने इतबारे करीत आहेत. मात्र संस्थाचालकांच्या ढिसाळ कारभारामुळे शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे १ वर्षापासून तर कांहीचे ६ महीन्यांपासुन वेतन थकल्याने शिक्षकांना वेतनाअभावी आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. दरम्यान मोंहडुळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच व समाजसेवक शरद जाधव यांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शिक्षक व संस्था व्यवस्थापन यांच्यात मध्यस्थी करून शिक्षकांचे थकलेले अर्धे वेतन जुन मध्ये व उर्वरित वेतन जुलै मध्ये देण्याचे व शिक्षकांना शासनाकडून वैयक्तिक मान्यता मिळवुन देणार असल्याचे संस्था व्यवस्थापनाने कबुल केले होते. मात्र पाठपुरावा करूनही त्यांनी काहीच कार्यवाही केली नसल्याचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे म्हणणे असुन सात दिवसांत सकारात्मक कार्यवाही न झाल्यास त्यांनी१५ जुलै पासून सामुदायिक रजेवर जाण्याचा निर्णय घेतला असुन त्याचे निवेदन शिक्षणाधिकारी पंचायत समिती भिवंडी यांना देण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी शाळा संस्था व्यवस्थापनावर असेल असा इशाराही देण्यात आला आहे.

## गोगावंच्या सरपंच सौ. सुरवसे यांच्या तर्फे कॉंग्रेसचे नूतन अध्यक्ष श्री मल्लिकार्जुन पाटील यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती माननीय श्री मल्लिकार्जुन पाटील यांची नुकतीच अक्कलकोट तालुक्याच्या कॉंग्रेस अध्यक्षपदी निवड झाली. त्याचा योग साधून गोगावच्या सरपंच तथा सरपंच परिषदेच्या जिल्हा समन्वयक सौ वनिता सुरवसे यांनी शाल श्रीफळ व गुच्छ देऊन सत्कार केला. त्यांच्या पुढील राजकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.



सक्षम विरोधी पक्षाची बाजू मांडण्यात आपल्याला यश येवो, माननीय खासदार प्रणिती ताई शिंदे आपल्या पक्षाच्या असून त्यांच्याकडून वागदरी विभागास आज पर्यंत काही निधी मिळाला नाही, आता आपण अक्कलकोट तालुक्याचे कॉंग्रेसचे अध्यक्ष झाला आहात, माझे गाव गोगाव सहित वागदरी भागातील गावांना खासदार निधी मिळवून द्यावे ही विनंती सरपंच सुरवसे यांनी केली केली. आम्ही आमदार सचिन दादा कल्याण शेट्टी यांचे निकटवर्तीय आहोत म्हणून आम्हाला खासदार निधी देणार नाहीत का? असा प्रश्न केल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर हसू आवरेना..पण आपल्या गोगाव सहित इतर गावांना सुद्धा यावेळी नक्की निधी मिळवून देणार असे आश्वासन पाटील साहेबांनी दिले. कॉंग्रेस अध्यक्ष पाटील यांचे पूर्वीपासून जिव्हाळ्याचे संबंध, त्यांचा १६ जून रोजी वाढदिवस असतो, पण दरवर्षी नेहमी वाढदिवसादिवशी पाटील साहेब बाहेरगावीच असतात म्हणून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सौ वनिता सुरवसे यांनी त्यांचा वाढदिवस उशिरा साजरा करून त्यांना जन्मदिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांच्याकडून देशाची, समाजाची, खास करून अक्कलकोटकरांची चांगली सेवा घडो अशी स्वामी चरणी प्रार्थना केली. यावेळी उद्योगपती मधुकर सुरवसे, इंजिनीयर सुधीर गायकवाड, यशस्वी पाटील शामल गायकवाड, संपूर्ण सुरवसे कुटुंब आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका**

# दत्तवाड कुमार व कन्या शाळा परिसरात उकिरडे, ग्रामपंचायतीची ‘गांधारी’ ची भूमिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दत्तवाड/प्रतिनिधी : दत्तवाड ता. शिरोळ येथील कुमार व कन्या शाळेच्या आजूबाजूस रस्त्याकडेच्या संरक्षण भिंतीला लागूनच मोठ्या प्रमाणात शेणीचे उकिरडे, शेणीच्या गोवऱ्या, कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी या विद्यार्थ्यांचा आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.




> **कुमार व कन्या शाळेत गोरगरिबांची मुले शिक्षण घेत असून शाळेच्या परिसरात शेणीचे उकिरडे, कचरा साचत असल्यामुळे परिसर अस्वस्थ बनला आहे. त्यामुळे शाळेतील मुलांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असून दत्तवाड ग्राम पंचायत यावर काय कारवाई करणार की, गांधारी ची भूमिका घेणार याची प्रतीक्षा आहे.**
>
> **– सुरज शिंगे**
> **सामाजिक कार्यकर्ते**

शाळेच्या परिसरातील नागरिक त्या ठिकाणी शेणीचे उकिरडे, गोवऱ्या लावणे, कचरा टाकत असल्यामुळे परिसरात घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसून येत आहे. वारंवार सूचना देऊन ही येथील नागरिकांनी सूचनेला केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे दत्तवाड ग्रामपंचायत आता कारवाई करणार का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

शाळेच्या सौंदर्यात यामुळे अडथळा येत असून कचरा शेणी, उकिरडे यांचे दर्शन घेऊनच मग शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश करावा लागत आहे. तसेच परिसरात उग्र वास व घाणीचे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. शाळेच्या संरक्षण भिंतीला लागूनच उकिरडे टाकल्यामुळे संरक्षण भिंतीला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. शिक्षक, विद्यार्थी, पालक, पादचारी, वाहनधारक यांना या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. सदर शाळेच्या परिसरात घाणीचे साम्राज्य असल्याने विद्यार्थ्यांना साथरोग आजार झाल्यास याला जबाबदार कोण? गेली कित्येक वर्षे झाली ही समस्या भेडसावत आहे. त्यामुळे दत्तवाड ग्राम पंचायत यावर कारवाई करणार का बघ्यांची भूमिका घेणार याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## पंढरीतील आषाढी वारीत अविरत कष्ट घेणाऱ्या पोलीस बांधवांचा व पत्रकार बंधूंना मिष्टान्नाची मेजवानी देऊन, श्रीपांडुरंग अन्नछत्र मंडळाच्या वतीने गौरव



पंढरपूर : प्रतिवर्षी आषाढी यात्रेत अहोरात्र कष्ट करुन, घरापासून लांब असणाऱ्या पोलीस बांधवांना यात्रेची सांगता सुखद व्हावी या उदात्त हेतूने, श्रीपांडुरंग अन्नछत्र मंडळाचे वतीने अध्यक्ष श्री अनिरुद्ध बडवे पाटील व त्यांचे चिरंजीव अक्षय बडवे पाटील यांच्या वतीने मोफत मिष्टान्नाची मेजवानी देण्यात येते.

पंढरीतील श्री पांडुरंग भवन येथे आषाढी पौर्णिमेच्या दिवशी म्हणजेच गुरु पौर्णिमेच्या दिवशी सकाळी ११ ते ४ यावेळेत हा उपक्रम मागील १० वर्षा पासून संपन्न करण्यात येतो. सामाजिक ऋण फेडण्यासाठी कटीबद्ध असणाऱ्या पितापुत्रांचे या सामाजिक योगदानाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

यावर्षी देखील रविवार दि १० रोजी या उपक्रमाची सुरुवात सर्व पत्रकार बंधू यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली असल्याची माहिती मंडळाचे सचीव अक्षय बडवे यांनी विषद केली.

याप्रसंगी आयबीएन लोकमतचे प्रतिनिधी विरेंद्र सिंह उत्पात, टीव्ही ९ चे प्रतिनिधी रविंद्र लव्हेकर, एबीपी माझा चे प्रतिनिधी सुनिल दिवाण, तसेच दै. तरुण भारतचे प्रतिनिधी महेश भंडारकवठेकर व चैतन्य उत्पात, मंदार लोहकरे, अतुल बडवे, सा.धन्यवाद चे संपादक शंकर कदम, पत्रकार कोरे, राजकुमार शहापुरकर, यांचा सन्मान श्रीकांत बडवे महाजन यांच्या हस्ते श्री विठ्ठलाची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.